पोआ/११(६)/(०२)/१६३/१०(२)/२०२६,                                                       दि. ०५ .१०.२०२६

## पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई
## आदेश

**ज्याप्रमाणे** मला कळविण्यात आले आहे की, मा. उच्च न्यायालय, मुंबई यांनी सुमोटो जनहित याचिका क्र. ०१/२०२६ दिनांक २२/०९/२०२६ मध्ये निर्देश दिले आहेत की, सार्वजनिक रस्ते, मार्ग इत्यादी ठिकाणी फटाके फोडण्यास पूर्णतः बंदी राहील तसेच फटाक्यांच्या वापरामुळे होणारे वायू प्रदूषण व ध्वनी प्रदूषण रोखण्यासाठी आणि सदर निर्देशांची अंमलबजावणी करण्यासाठी संबंधित प्राधिकरणांनी आवश्यक ती सर्व उपाययोजना करावी.

**आणि ज्याअर्थी**, मा. मुंबई उच्च न्यायालय, यांनी सदर सुमोटो जनहित याचिका मध्ये संबंधित प्राधिकरणांना लेझर लाईट्स, उच्च तीव्रतेच्या लुमेन लाईट्स (High Intensity Lumen Lights) तसेच बीम्स (Beams) यांच्या वापरास प्रतिबंध/बंदी करण्याचे निर्देश दिले आहेत.

**आणि ज्याअर्थी**, मा. उच्च न्यायालय, मुंबई यांनी वरीलप्रमाणे दिलेल्या निर्देशांच्या अनुषंगाने तातडीने प्रतिबंधात्मक उपाययोजना करणे आवश्यक आहे.

**म्हणून मी, अकबर पठाण, पोलीस उप आयुक्त (अभियान), बृहन्मुंबई** तथा कार्यकारी दंडाधिकारी, बृहन्मुंबई, मला भारतीय नागरिक सुरक्षा संहिता, २०२३ च्या कलम १६३ अन्वये तसेच महाराष्ट्र पोलीस अधिनियम, १९५१ च्या कलम १० च्या उपकलम (२) अन्वये प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून याद्वारे पुढीलप्रमाणे आदेश देत आहे.

**बृहन्मुंबई पोलीस आयुक्तालयाच्या अधिकारक्षेत्रात सर्व व्यक्तींना**

**(i) सार्वजनिक रस्ते, मार्ग इत्यादी ठिकाणी फटाके, आतषबाजी, रॉकेट्स इत्यादी फोडण्यास/वापरण्यास, तसेच**

**(ii) लेझर लाईट्स, उच्च तीव्रतेच्या लुमेन लाईट्स आणि बीम्स वापरण्यास, प्रतिबंध करण्यांत येत आहे.**

**हा आदेश दि. ०६/१०/२०२६ रोजी ००.०१ पासून दिनांक ०४/१२/२०२६ रोजी २४.०० वाजेपर्यंत (त्यापुर्वी मागे घेतल्याशिवाय) लागू राहील.**

कोणतीही व्यक्ती या आदेशाचे उल्लंघन करील, तर तिच्यावर ध्वनि प्रदूषण (नियमन व नियंत्रण) नियम २०००, पर्यावरण (संरक्षण) अधिनियम, १९८६, भारतीय न्याय संहिता, २०२३, स्फोटक अधिनियम, १८८४ तसेच इतर लागू असलेल्या कायद्यान्वये कारवाई करण्यात येईल.

हा आदेश तातडीच्या परिस्थितीमुळे एकतर्फी (Ex-Parte) पध्दतीने लागू करण्यात येत आहे. मी पुढे असे निर्देश देतो की, हा आदेश बृहन्मुंबईत सार्वजनिक ठिकाणे, न्यायालये, सरकारी कार्यालये यांच्या सुस्पष्ट भागांमध्ये त्याच्या प्रती चिकटवून आणि लाऊडस्पीकर किंवा मेगाफोनच्या माध्यमातून तसेच उपलब्ध असलेल्या कोणत्याही स्वरूपात प्रसारमाध्यमांद्वारे प्रसिध्द करून प्रकाशित केला जाईल.

सदरचा आदेश माझ्या सही शिक्यानिशी आज दिनांक ०५ **ऑक्टोंबर, २०२६** रोजी दिला आहे.

पोलीस आयुक्त,
बृहन्मुंबई यांचे कार्यालय

Deputy Commissioner of Police (Operations) Brihan Mumbai

( अकबर पठाण )
पोलीस उप आयुक्त (अभियान),
तथा कर्यकारी दंडाधिकारी,
बृहन्मुंबई.

**********

Scanned with CamScanner

**C.P./XI (6)/(02)/163/10(2)/2026,** **Dt.05 .10. 2026**

**THE COMMISSIONER OF POLICE, GREATER MUMBAI**
**ORDER**

**WHEREAS** it has been directed by the Hon'ble Bombay High Court, Mumbai in SM PIL No. 01/2026 dated 22/09/2026 that, there shall be a total ban to the bursting of firecracker on public street, roads etc. and authourities to take all measures to implement the said directions and prevent air and noise pollution being generated by the use of firecrackers.

**AND WHEREAS** it has also been directed by the Hon'ble Bombay High Court, Mumbai in said SM PIL that the authorities shall prohibit/ban the use of laser lights, high intensity lumen lights and beams.

**AND WHEREAS** in accordance with the direction of the Hon'ble Bombay High Court, Mumbai. mentioned here in above, it is necessary to take urgent preventive measures.

**NOW, THEREFORE, I, Akbar Pathan, Dy. Commissioner of Police (Operations),** Greater Mumbai and Executive Magistrate, Brihanmumbai, vide powers conferred upon me under section 163 of the Bharatiya Nagarik Suraksha Sanhita, 2023 read with sub-section (2) of section 10 of the Maharashtra Police Act 1951 do hereby order that.

**All persons are prohibited from i) bursting firecrackers, fireworks, rockets etc on public streets, road etc. and ii) use of laser lights, high intensity lumen lights and beams within the jurisdiction of Brihanmumbai Police Commissionerate.**

**This order will remain in force from 00.01 hrs on 06/10/2026 till 24.00 hrs on 04/12/2026 (unless withdrawn earlier).**

Any person contraventing this order shall be liable for penal actions under the provision of the Noise Pollution (regulation and Control) Rules, 2000, the Environment (Protection) Act, 1986, Bharatiya Nyaya Sanhita, 2023 as well as the Explosive Act 1884 and other relevant statutes.

I further direct that this order will be published and promulgated in Brihanmumbai by affixing copies thereof, in conspicuous part of Public Places, Courts, Govt Offices and by proclaiming the same through loudspeakers or megaphones as well as publishing through media of whatever form available.

Given under my hand and seal on this 05th day of the **October, 2026.**

Office of the
Commissioner of Police,
Brihanmumbai.

( Akbar Pathan )
**Dy. Commissioner of Police (Operations),**
**and Executive Magistrate**
**Brihanmumbai**

********

Scanned with CamScanner